# <u>प्रेसनोट</u>

दि. ०६/०८/२०२४

## कुडे बुद्रूक, ता. खेड, जि. पुणे येथील पशुधन पर्यवेक्षकावर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | बंडू बबन देवकर, वय ४३ वर्ष, पद - पशुधन पर्यवेक्षक, कुडे बुद्रुक ता. खेड, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,०००/- (सात हजार रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ३१/०७/२०२४, दि. ०१/०८/२०२४ व दि. ०५/०८/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. ०६/०८/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ०६/०८/२०२४ रोजी १३.२० वा. चे सुमारास पशु वैद्यकीय रुग्णालय, कुडे बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी महाराष्ट्र राज्य स्तरीय योजना दुधाळ गाई / म्हशीचे वाटप करणे या योजनेचा लाभ मिळणेकरीता ऑनलाईन अर्ज सादर केला होता. लोकसेवक बंडू देवकर यांनी तक्रारदार यांना नमूद योजनेच्या अंतिम यादीमध्ये लाभार्थी म्हणून नाव घालून देतो. त्याकरीता लोकसेवक बंडू देवकर यानी तक्रारदार यांचेकडे ७,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे कडे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक बंडू देवकर यानी वरील काम करुन देण्यासाठी पंचासमक्ष रक्कम रुपये ७,०००/- पैकी तडजोडीअंती ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक बंडू देवकर यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्यांचा रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.